(२६)

१

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

मंगळवार दिनांक २९ नोव्हेंबर १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २६ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची २६ वी बैठक मंगळवार दिनांक २९ नोव्हेंबर १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] श्री. मनोहर विठोबा कोंकाटे,	सभापती.
२] श्री. अशोक लाल,	उपसभापती तथा मुख्य अधिकारी.
३] श्री. सुनील कर्वे,	सदस्य.
४] श्री. राजा चव्हाण,	-"-
५] श्री. बाळकृष्ण धुमाळे,	-"-
६] श्री. हेमंत मंडलिक,	-"-
७] श्री. रविंद्र कोटकर,	-"-
८] श्री. मोहन देसाई,	-"-
९] डॉ. माला पाटील,	-"-
१०] श्री. चेतन शाह,	-"-
११] श्री. कृष्णा गेनू कांबळे,	-"-
१२] श्री. अब्दुल रौफ पटेल,	-"-
१३] श्रीमती सरोज कपाडिया.	-"-
१४] श्री. गजेंद्र लष्करी,	-"-
१५] श्री. रॉकी कास्टो,	-"-
१६] श्री. उमाशंकर ओझा,	-"-
१७] प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी.	

मा. उप सचिव श्री. यादवराव कांबळे यांनी दिवाळी अधिवेशनाच्या कामकाजामुळे आजच्या बैठकीस हजर राहता येणार नाही असे आगाऊ कळविले होते.

सभेस सुरुवात करण्यापूर्वी मा. सदस्य श्री. मोहन देसाई

....२/..

- २ -

यांनी नागपूर येथे बुधवार दिनांक २३.११.९४ रोजी झालेल्या गोवारी समाजाच्या भीषण दुर्घटनेबाबत तीव्र दु:ख व्यक्त करुन सदर दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींना दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्याचा शोक प्रस्ताव मांडला. तद्नुसार उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून मृत व्यक्तींना श्रध्दांजली वाहिली.

शोक ठराव :- २४/१७८

नागपूर येथे बुधवार दिनांक २३.११.९४ रोजी गोवारी समाजाच्या झालेल्या भीषण दुघटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करुन त्यात मृत पावलेल्या व्यक्तींच्या आत्म्यास शांती लाभो असा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

उपसभापती व मुख्य अधिकारी श्री. अशोक लाल यांनी शासनाने नियुक्त केलेल्या १] श्री. गजेंद्र लष्करी, २] श्री. रॉकी क्रास्टो व ३] श्री. उमाशंकर ओझा या नवीन तीन मा. सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सभागृहास त्यांची ओळख करुन दिली.

तद्नंतर उपसभापती व मुख्यअधिकारी यांनी मा. सभापतींच्या वतीने उपस्थित सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन आजच्या बैठकीस औपचारिकरित्या सुरवात केली.

बाब क्रमांक :- २६/१.

विषय :- दि. १६.१०.९४ आणि दि. दि. १९.११.९४ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करणेबाबत.

....३/..

अ] दिनांक १८.१०.९४ रोजी आलेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त मा. सदस्यांच्या अवलोकनार्थ पृष्ठ क्र. १ ते २३ वर सादर करण्यांत आलेला आहे.

ब] दिनांक १९.११.९४ रोजी आलेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त पृष्ठ क्र. २५ ते ९४ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर कार्यवृत्तान्तावर चर्चा होवून सर्वानुमते सदर कार्यवृतांत स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक :- २६.२
=================

विषय :- अनुपालन अहवाल.

मागील बैठकीत दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्य अभियन्ता [उत्तर], दुवपु यांनी मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी कामाठीपुरा पाचवी गल्ली येथील फितवाला जुनी चाळबाबतच्या उपस्थित केलेल्या प्रश्नावर सविस्तर तपशिलासहीत अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ९७ वर सादर केला आहे. सदर अनुपालन अहवालावर चर्चा होवून त्याची नोंद घेण्यांत आली.

बाब क्रमांक :- २६.३
=================

पुनर्बांधणी विभागाचे प्रस्ताव.
प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१] इ.क्र. १८ त्रिभूवनदास रोड," डी" विभाग, मुंबई.

या इमारतीस प्रशासकीय मंजूरी मिळणे-बाबत बाब टिप्पणी पृ.क्र. ९९ ते १११ वर सादर करण्यांत आली आहे. या प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सभागृहास अवगत करुन दिले की, सदर इमारतीची पुनर्बांधणी केल्यावर मंडळास पूर्वीच्या सर्व भाडेकरुंना सामावून घेतल्यानंतर ६ निवासी व १ अनिवासी अतिरिक्त सदनिका उपलब्ध होणार आहेत, ही योजना प्राथमिक स्वरुपाची आहे. तरी उपस्थितांनी सदर पुनर्बांधणी योजनेस ५८.५० लक्ष एवढया खर्चास मंडळाने प्रशासकीय मंजूरी द्यावी अशी विनन्ती केली. यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर इमारतीचे नकाशे तयार करताना सदर मालमत्तेवर उपलब्ध असलेला चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्यांत आलेला नाही, तरी त्याची काय कारणे असावीत? यावर चर्चा करताना उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असा खुलासा केला की, मंडळामार्फत पुनर्बांधणी प्रस्ताव तयार करताना इमारतीच्या उंचीचे बंधन असते, तसेच पाच मजल्यावरील इमारतींना उद्वाहनाची सोय करावी लागते. तसेच काही वेळा सेटबॅक असल्यामुळे उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक वापरता येत नाही. यावर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी असे सांगितले की, उपलब्ध असणारा चटईक्षेत्र निर्देशांक व वापरण्यांत आलेला चटईक्षेत्र निर्देशांक यामधील फरक हा नाममात्र आहे. तसेच मंडळाला पाच मजल्यांच्या वरील मजल्यांसाठी उद्वाहनाची सोय करावी लागते, त्यामुळे शक्यतो पाच मजल्यापर्यंतच इमारतीचे बांधकाम केले जाते. यावर मा. सदस्य श्री. ओझा यांनी असे सांगितले की, उर्वरित

पूर्तत
उ.मु.अ

उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक प्रत्येक खोल्यांच्या बालकनी-साठी वापरल्यास उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक पूर्णपणे वापरला जाईल. यावर मुख्य अधिकारी यांनी संबंधित उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांना असे निर्देश दिले की, सदर बाबीची शहानिशा करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

पूर्तता
उ.मु.अ.[पुनर्र.]

यावर श्री. पोतद्दार, कार्यकारी अभियंता महानगरपालिका यांनी असे प्रतिपादन केले की, महानगरपालिकेला शक्य असल्यास उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक पूर्णपणे वापरण्यास मंडळास मंजूरी देण्यांत येईल. तरी मंडळाने सुधारीत नकाशे महानगरपालिकेकडे सादर करावेत. तद्नंतर सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :- २६/१७९

इमारत क्रमांक १८ त्रिभुवनरोड मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या ५८.५० लक्ष एवढ्या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

२] इ.क्र. २६०-२६० अ कुका बिल्डींग, फ/द विभाग.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ११३ ते १२३ वर सादर करण्यांत आली आहे. सदर बाब टिप्पणीवर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर योजनेच्या पुनर्बांधणीचे काम दिनांक ३१.१२.९० रोजी पूर्ण झाले असून महानगर-पालिकेकडून दिनांक ११.१.९१ रोजी निवासी परवाना मिळाला आहे. तेथील सर्व गाळे रहिवाश्यांना वितरीत करण्यांत आले आहेत. सदर पुनर्बांधणी योजनेवर अद्यापपर्यंत रु. ५९.४५ लक्ष इतका खर्च झालेला

...६/...

झालेला आहे. अंतिम देयक, मजूर व वस्तूंच्या दरातील वाढीचे देयक इ. मिळून एकंदरीत रु. ८ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर योजनेस ६७.४६ लक्ष खर्चास मंडळाने सुधारीत आर्थिक मंजूरी देण्याबद्दल विनंती केली. त्यांनी सभागृहास पुढे असे अवगत करून दिले की, सदर मालमत्तेवर उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक पूर्णपणे वापरण्यांत आलेला आहे. तसेच पूर्वीच्या सर्व रहिवाश्यांना सामावून घेवून मंडळास ८९ गाळे अतिरिक्त उपलब्ध झाले आहेत. सविस्तर चर्चेअंती सदर योजनेच्या रु. ६७. खर्चास सुधारीत आर्थिक मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- २६/१८०

इमारत क्र. २६० – २६० अ, कुका बिल्डिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, "फ/द" विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या रु. ६७.४६ लक्ष एवढया खर्चास सुधारीत आर्थिक मंजूरी सर्वानुमते देण्यांत आली.

बाब क्रमांक :- २६.४

विषय :- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव.

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांचे प्रस्ताव पृष्ठ क्र. १२५ ते २३९ वर सादर केलेले आहेत. सदर प्रस्तावांची थोडक्यात माहिती

....७/....

मुख्य अधिकारी, दुवपु. यांनी सभागृहात दिली.
सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अवगत करुन दिले की, मागील बैठकीत वरील विषयावर चर्चा करताना असा मुद्दा उपस्थित केला होता की, पुढील दुरुस्तीची अंदाजपत्रके सादर करताना इमारतीचे नाव, रस्ता, क्रमांक व विभाग इ. चा सविस्तर तपशिल देण्यांत यावा. परंतू आजच्या बैठकीत जी अंदाजपत्रके सादर करण्यांत आलेली आहेत, त्यांची नांवे तपशिलवार देण्यांत आलेली नाहीत. यावर मा. सभापती, दुवपु यांनी मुख्य अधिकारी यांना अशी विनन्ती केली की, पुढील बैठकीत दुरुस्तीची अंदाजपत्रके सादर करताना त्या इमारतीचे नांव, रस्ता, क्रमांक, विभाग वैगरेचा सर्व सविस्तर उल्लेख असावा. यावर मुख्य अधिकारी यांनी संबंधित उपमुख्य अभियन्ता उत्तर व दक्षिण यांना याबाबत योग्य त्या सुचना दिल्या. सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट "अ" वरील सर्व दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :- २६/१८१

परिशिष्ट "अ" मधील

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आतापर्यंत दक्षिण परिमंडळातील व उत्तर

परिमंडळातील एकूण किती इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्यांत आली आहे व किती इमारतींच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे, किती इमारतींच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे आणि किती इमारती अद्याप दुरुस्तीसाठी हाती घेण्यांत आलेल्या नाहीत, याबाबतची माहिती सर्व सन्मा. सदस्यांना पुढील बैठकीत देण्याची त्यांनी मुख्य अधिकारी, दुवपु यांना विनन्ती केली. यावर मुख्य

पूर्तता
उ.मु.अ.[द/उ]

अधिकारी, दुवपु यांनी असे आश्वासन दिले की, पुढील बैठकीत सन्मा. सदस्यांनी मागणी केलेली माहिती सादर करण्यांत येईल. त्यांनी पुढे असे सांगितले की, दुरुस्ती मंडळाचा जो २३ कोटीचा मंजूर निधीआहे त्यापैकी मंडळाने आन्तापर्यंत १३ कोटी खर्च केलेले आहेत व पुढील मार्च ३१ पर्यन्त १० कोटी खर्च करावयाचा आहे. तरी मंडळाने जी आन्तापर्यंत अंदाजपत्रके मंजूर केली आहेत, त्या कामांसाठी

पूर्तता
उ.मु.अ.[दुवपु]

निधी उपलब्ध करुन देणेही मंडळाची बांधीलकी आहे, तरी मार्च पर्यंत मंजूर कामांना किती खर्च लागणार आहे व मार्च नंतर मागील वर्षाच्या कामांसाठी किती निधीची गरज भासणार आहे, याचीही माहिती सदस्यांना देण्यांत येईल. यावर मा. सदस्य श्री. रविंद्र कोटकर यांनी असे प्रतिपादन केले की, याबाबतची माहिती मागिल बैठकीत मागविण्यांत आली होती.

बाब क्रमांक :- २६.५

विषय :- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव.

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची अंदाजपत्रके पृष्ठ क्र. २४१ ते २७७ वर सादर करण्यांत आलेली आहेत. सदर प्रस्तावांबाबत थोडक्यात माहिती मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सभागृहास दिली व सदर इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबतची विनन्ती केली.

उत्तर परिमंडळातील दुरुस्तीच्या प्रस्तावा-वर सविस्तरपणे चर्चा होवून परिशिष्ट "ब" वरील सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- २६/१८२

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या परिशिष्ट "ब" वरील अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. हेमंत मंडलिक यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आम्ही ज्या सुचना देतो त्या अंमलात आणल्या जात नाहीत हे बरोबर नाही. मा. सदस्य श्री. उमाशंकर ओझा यांनी असे सांगितले की, उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी ज्या ठेकेदारांची नियुक्ती करण्यांत येते ते बरोबर काम करत नसल्याच्या तक्रारी लोकांकडून त्यांच्याकडे येतात. तरी सदर दुरुस्ती कामाची पहाणी मा. सदस्यांनी करावी. यावर मा. सभापती यांनी असा खुलासा केला की, माझ्याकडे ज्या ज्या तक्रारी आलेल्या आहेत, त्या त्या इमारतींची पहाणी मी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर केलेली आहे व त्यात ज्या त्रुटी आढळल्या त्या त्यांच्या निदर्शनास आणून

दिलेल्या आहेत, तरी मा. सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, त्यांच्या विभागातील काही तक्रारी असल्यास त्यांनी त्या माझ्याकडे धाव्यात, जेणेकरुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी दुरुस्ती मंडळाच्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पाबाबत सभागृहास अवगत केले की, चालू आर्थिक वर्षामध्ये उत्तर व दक्षिण परिमंडळाचे जे बजेट आहे ते २३ कोटीचे आहे. ऑक्टोबर अखेरपर्यंत १३ कोटी रुपये खर्च करण्यांत आलेले आहेत. मागच्या वर्षी जो खर्च झाला होता तो जास्त झाला होता म्हणून ४ ते ५ कोटीची देयके अदा केली नव्हती. परंतू त्यामुळे बरीचशी चालू असलेली कामे बंद करावी लागली होती. परंतू चालू वर्षात तशी परिस्थिती नाही, त्यामुळे दुरुस्तीच्या खर्चावर नियंत्रण आहे. यावर्षी शासनाने प्राधिकरणाला असे निर्देश दिले आहेत की, त्यांनी मंडळास १० कोटीचा निधी पारित करावा, त्याप्रमाणे प्राधिकरणाने मंडळास १० कोटी व त्यापेक्षाही जास्त निधी दिलेला आहे. आता शासनाला अशी विनन्ती केली आहे की, त्यांचा जो १२ कोटीचा सहभाग आहे तो टप्प्याटप्प्याने दरमहिन्याला एक कोटी यायला पाहिजे. तसेच महानगरपालिकेच्या उपकर विभागाकडून जी रक्कम शासनाकडे पारित केली जाते ती रक्कमही शासनाला देण्याबाबत कळविले आहे. शासनाने मार्चमध्ये तीन कोटीचा जास्त निधी मंडळास उपलब्ध करुन दिला होता. यावर्षी परत त्यांना विनन्ती केली आहे, की अतिरिक्त निधी उपलब्ध करुन धावा, म्हणजे पुढच्या ३/४ महिन्यात मंडळाला त्याचा उपयोग करता येईल. परंतू आजच्या क्षणी आपले जे मंजूर बजेट आहे व महानगरपालिकेकडून उपकरातून मिळणारा निधी, राज्यशासनाकडून मिळणारा निधी, महानगरपालिकेकडून मिळणारे अनुदान यासर्वातून मिळणारा जो

निधी आहे, त्याप्रमाणात खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवले जाईल.

मागील बैठकीत अध्यक्षांच्या परवानगीने सादर करण्यांत आलेल्या बावला कंपाउंड येथील नियोजित "डी" इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होवून मा. सभापती यांनी सदस्य श्री. मोहन देसाई यांना येत्या आठ दिवसात सदर संस्थेमार्फत राबविल्या जाणा-या बावला कंपाउंडची संपूर्ण पुनर्विकास योजनेबद्दलची माहिती देण्यास सांगितले होते.

तदनुसार मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी बावला कंपाउंडच्या भारतीय विद्याभवन सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी जे निवेदन पाठविला आहे तो सभागृहास वाचून दाखविले. यावर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी असा खुलासा केला की, भाडेकरुंनी यापूर्वी कोर्टात आवहान केले होते, त्यावर कोर्टाने मंडळाच्या बाजूने निकाल दिला. भाडेकरुंनी कोर्टामध्ये सांगितले होते की, या संपूर्ण योजनेचे नियोजन आम्हाला विश्वासात घेवून केले पाहिजे. त्यानुसार संबंधित भाडेकरुंची बैठक बोलावली होती. सदर चर्चेच्या वेळी त्यांना स्पष्ट कल्पना देण्यात आली की, मंडळाचा जो नियम आहे, तो म्हणजे प्रत्येक भाडेकरुला १८० चौ. फू. चा कार्पेट एरिया दिला जातो, या नियमाच्या अनुषंगाने हे संपूर्ण चटई क्षेत्र वापरायचे आहे. तसेच मंडळाला संपूर्ण उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याचे बंधन आहे, त्यामुळे त्याप्रमाणे नियोजित नकाशे बनवावे लागतात. मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी वाचून दाखविलेल्या संपूर्ण निवेदनानुसार जर आपण या योजनेचा प्रकल्प त्यांच्या हातात दिला तर त्यांना फक्त १.३३ चटई क्षेत्र निर्देशांक

...१२/...

मिळेल, त्यांची जर अशी अपेक्षा असेल की, त्यांना २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मिळणार आहे, तर ते आजच्या स्थितीत शक्य नाही. भाडेकरुंनी मा. सचिव, गृहनिर्माण यांना अशी विनन्ती केली आहे की, त्यांना २.०० प्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक मिळावा, परंतू शासनाकडून मंडळाला याबाबत कुठल्याही प्रकारेचे निर्देश मिळालेले नाहीत. मागच्या बैठकीत असे ठरले होते की, [illegible] मंडळाने निर्णय घेणे आवश्यक आहे, पुढच्या बैठकीपर्यंत ६/७ दिवसामध्ये भाडेकरुंनी मंडळाला असे निवेदन सादर करावे की, त्यांची संपूर्ण तयारी आहे, त्यांच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध आहे, ते बांधकाम करु शकतात, तद्नंतर मंडळ त्यावर विचार करु शकेल. जर भाडेकरुंनी असे सांगितले की, त्यांची इच्छा आहे आणि ते पुनर्विकासाचे काम सुरु शकतील तर सदर योजना राबविण्यासाठी हे पुरेसे नाही. भाडेकरुंची अशी इच्छा दिसते की, या टेन्डरचे काम देवू नये व मंडळाने हा प्रकल्प पुढे राबवू नये. याबाबत मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, मंडळाने सध्या त्या जागेवर "वॉच ॲन्ड वार्ड" ठेवलेला आहे. तसेच तेथे मुळ रहिवाशी आहेत, व काही अनधिकृत झोपडीधारक आहेत, त्यांचा या योजनेमध्ये समावेश करुन घ्यावयाचा आहे. मध्यंतरी काही लोक जे अनधिकृत होते त्यांनी झोपडया बांधून कलेक्टर कडून फोटोपास मिळविले आहेत. याबाबत कलेक्टरशी पत्र पाठवून बोलणी केली व त्यांना विनन्ती करुन हया योजनेची संपूर्ण माहिती दिली, व याबाबत त्यांनी कुठलाही फोटोपास देवू नये म्हणून विनन्ती केली. हे प्रकरण गेली १७ वर्षे असेच, प्रलंबित आहे आणि यामधून काही निष्पन्न

२५

होईल असे वाटत नाही, आणि दिवसेंदिवस बांधकामा-वरील खर्च वाढत जात आहे. तसेच मोकळया जागे-वरील अनधिकृत बांधकामे वाढत जातील. यावर मा. सभापती श्री. कोकाटे यांनी उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांना अशी विचारणा केली की, आपण जो हा प्रकल्प राबवित आहे तो संपूर्ण बावला कंपाऊंडसाठी आहे की, एका इमारतीसाठी आहे. यावर उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] श्री. शहा यांनी सांगितले की, सध्याचा प्रस्ताव हा "डि" इमारतीसाठी आहे.

सविस्तर चर्चेअंती मा. सभापती श्री. कोकाटे यांनी असे प्रतिपादन केले की, बावला कंपाऊंडचा परिसर हा संपूर्ण गिरणी कामगारांचा आहे. त्यातील रहिवाश्यांनी जी विनन्ती केली आहे, तीचा सर्व सन्मा. सदस्यांनी विचार करावा. त्यांनी पुढे असेही सुचविले की, आपण सर्व सदस्य व संबंधित अधिकारी यांची मंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करुन हा प्रश्न शासनामार्फत सोडवावा असे वाटते. यावर मा. सदस्य श्री. ओझा व मा. सदस्य श्री. सुनिल कर्वे यांनी सांगितले की, मा. सभापतींनी जी सुचना मांडली आहे, तीच्याशी आम्ही सर्व सदस्य सहमत असून त्याप्रमाणे बावला कंपाऊंडच्या पुनर्विकासाबाबत पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

पूर्तता
उ.मु.अ[पुर्न]

बाब क्रमांक :- २६.६

विषय :- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव.

२१७

१/- भूकर पहाणी क्र. ५२२, मलबार हिल विभाग इमारत क्र. २०, ऑगस्ट क्रांती मार्ग, "ड" विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.....

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २७९ ते २८५ वर सादर करण्यात आली आहे.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, सदर मालमत्तेच्या भूखंडाचे क्षेत्रफळ ३३७७.९६ चौ.मी. असून सदर भूखंडावर एकूण ८ इमारती आहेत, त्यापैकी ७ इमारती "अ" वर्गात आहेत व एक इमारत बिन उपकरप्राप्त आहे. तसेच पूर्वीच्या सर्व भाडेकरूंना सामावून घेतल्यावर विकसकास खुल्या बाजारात विकण्यासाठी ९८५.५४ चौ.मी. [अंदाजे] अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे व अतिरिक्त क्षेत्रफळाची टक्केवारीही ५० टक्के पेक्षा कमी येत असल्यामुळे परिशिष्ट ३ प्रमाणे मंडळाला काहीही अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध होत नाही. तसेच त्यांनी उपस्थित सभासदांना सदर मालमत्तेस "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याविषयी मंजूरी देण्याची विनन्ती केली.

यावर सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक :- २६/१८३

भूकर पहाणी क्र. ५२२, मलबार हिल विभाग इमारत क्र. २०, ऑगस्ट क्रांती मार्ग, "ड" विभाग, मुं. येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी दिली.

...१५/..

२/- भूकर पहाणी क्र. २३०, भायखळा विभाग इ.क्र. २२२ ते २४० बेलासिस मार्ग, उपकर क्र. ई-३३१२ [२], ३३१३, ई विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २५७ ते २९१ वर सादर करण्यांत आली आहे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर मालमत्तेच्या भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ २७८७.६५ चौ.मी. एवढे आहे. सदर भूखंडावर एक इमारत अस्तित्वात असून त्यामध्ये एकूण ५१ भाडेकरु/रहिवाशी रहातात. पूर्वीच्या सर्व भाडेकरुंना सामावून घेतल्यावर विकसकास १९८७.३२ चौ.मी. एवढे अतिरिक्त क्षेत्रफळ खुल्या बाजारात विकण्यासाठी उपलब्ध होणार आहे. त्याच्या व्यतिरिक्त सदर मालमत्ता ही विकास आराखडा सार्वजनिक गृहनिर्माणाकरीता आरक्षित असल्यामुळे एकूण अतिरिक्त क्षेत्रफळाच्या प्रत्येकी ५ टक्के क्षेत्रफळ महापालिकेस व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना सुपूर्द करणे आवश्यक आहे. तरी उपस्थितांनी सदर प्रस्तावास मंजूरी देण्याची विनन्ती केली. यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. हेमंत मंडलिक यांनी मा. सभापती यांना अशी विनन्ती केली की, सदर मालमत्ता ही माझ्या विभागातील असून त्यास "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यापूर्वी आपल्या काही नविन सदस्यांकडून त्याची पहाणी करण्यांत यावी. यावर मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. हेमंत मंडलिक यांची विनन्ती मान्य करुन सदर मालमत्तेस सर्वश्री राजा चव्हाण [वास्तुशास्त्रज्ञ], बाळकृष्ण धुमाळे [इंजिनिअर] व हेमंत मंडलिक [स्थानिक सदस्य] यांनी भेट द्यावी व त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल त्यांनी सादर करावा. त्यानंतर मा. सभापती त्यावर सदर मालमत्तेस पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबतचा

....१६/...

अंतिम निर्णय घेतील. अशा प्रकारे चर्चा होवून सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :- २६/१८७

मूळ पहाणी क्र. २३०, भायखळा विभाग इमारत क्र. २२२ ते २४० बेलासिस मार्ग, उपकर क्र. ई-३३१२ [२], ३३१३, ई विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत मा. सभापती यांनी सर्वश्री राजा चव्हाण [वास्तुशास्त्रज्ञ], बाळकृष्ण धुमाळे [इंजिनिअर], व हेमंत मंडलिक [स्थानिक सदस्य] यांना सदर मालमत्तेची पहाणी करण्यास सांगितले व त्यांच्या अहवालानंतर सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा अंतिम निर्णय मा. सभापतींनी घेण्याचे ठरले.

बाब क्रमांक :- २६.७

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने घ्यावयाचे आयत्या वेळेचे विषय.

मा. सदस्य श्री. रौफ पटेल यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, "ई" विभागातील मौलाना आझाद रोड येथील तीन इमारती वीस वर्षापूर्वी पडलेल्या होत्या, परंतू त्यांची अजूनपर्यंत पुनर्बांधणी झाली नाही, तसेच तेथील एक इमारत पडकीवाला चाळ या इमारतीमध्ये एक हॉटेल आहे व त्या हॉटेलातील मालकाने एक अनधिकृत शेड उभी केलेली आहे. सदर पडलेल्या इमारतीमधील भाडेकरु कोठे रहात आहेत तेही माहित नाही, परंतू त्या

पूर्तता
उ.मु.

इमारतीनंतर आणखी तीन इमारती १] मोनबत्तीवाला चाळ २] खोजावाला चाळ ३] अकरा मंजील त्याच विभागातील पडल्या होत्या त्यांची पुनर्बांधणी करण्यात आली. या इमारतीमध्ये मंडळास पुरेसे अतिरिक्त गाळे उपलब्ध झाले होते, परंतु हे अतिरिक्त गाळे कोणाला दिले गेलेत हे माहित नाही. तसेच वक्कीवाला चाळ ही त्याच इमारतींच्या बाजूला असून तीची पुनर्बांधणी का झाली नाही व त्याची कारणे काय असावीत याबद्दलची माहिती देण्याचीत्यांनी मा. सभापती व मुख्य अधिकारी यांना विनंती केली. यावर मुख्य अधिकारी यांनी चौकशी करुन सदर बाबतची माहिती आगामी बैठकीत सादर करण्याचे आश्वासन दिले. तसेच मा. सभापती यांनी संबंधित अधिकारी यांना सदर बाबतची नोंद घेवून पुढील बैठकीत सदरची माहिती सादर करावी असे निर्देश दिले. त्यांनी पुढे असेही सुचविले की, दुरुस्ती विभागातील "ई" विभाग व "बी" विभागात मंडळाच्या जागेत जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे, त्यावर संबंधित अधिकारी काय कार्यवाही करतात, त्याचा अहवाल सुध्दा सादर करावा.

पूर्तता
उ.मु.अ. [पुनर्र.]

मा. सदस्य श्री. ओझा यांनीअसे सांगितले की, दक्षिण परिमंडळातील काचवाला बिल्डींगच्या पुनर्बांधणीबाबत तेथील रहिवाशी त्यांना व्हेकेशन नोटीस न दिल्यामुळे कोर्टात गेल्याने तो प्रकल्प अजूनपर्यंत कार्यान्वित होऊ शकला नाही. यावर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्प हा राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत येत असून त्याबाबत आपण मा. मुख्य अधिकारी श्री. गोरडे यांच्याशी संपर्क साधावा.

चर्चेच्या ओघाओघात श्री. ओझा यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, प्रतिक्षा नगर सायन कोळीवाडा येथील संक्रमण शिबीरामधील गाळे धारकांचे......

[पुढील पानावर]. १८/...

सिमेंन्टची कामे होत नाहीत अशा तक्रारी आहेत. याबाबत संबंधित अभियंत्यांकडे चौकशी केली असता ते सांगतात की त्यांचेकडे सिमेन्ट उपलब्ध नाही आहे. तसेच सिमेन्टसाठी इंडेन्ट भरलेले आहे. तरी आतापर्यंत जानेवारी १९९७ पासून सायन प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिरात किती सिमेन्ट दिलेले आहे व त्याचा वापर कशासाठी केला गेला याची माहिती यावी, अशी त्यांनी विनंती केली. यावर मुख्य अधिकारी यांनी याबाबतची चौकशी करुन माहिती आगामी बैठकीत देण्याचे आश्वासन दिले.

पूर्तता
उ.नु.अ.[उ]/
का.अ./फ.उ./गऊ
विभाग.

मा. सदस्या श्रीमती सरोज कपाडीया यांनी असे सांगितले की, डॉकयार्ड रोड, दुसरी कारपेन्टर स्ट्रीट येथील "संकल्प निकेतन" या तीन वर्षापूर्वी पुनर्रचित केलेल्या इमारतीमध्ये बाथरुममधून पाण्याची गळती जेव्हापासून लोक तेथे रहावयास आलेले आहेत तेव्हापासून होत आहे. त्याबाबत त्यांनी संबंधीत खात्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन आजपावेतो कोणी तेथे पहावयास आले नाही कि गळतीचे काम केले गेले नाही.

यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिकारी यांना याची नोंद घेवून सदर इमारतीची पहाणी करुन व योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

पूर्तता
का.अ.पु.वि.[२]

मा. सदस्य श्री. रविंद्र कोटकर यांनी मा. सभापतींना अशी विनंती केली की, गावदेवी दर्शन व त्यासोबत इतर दोन-तीन इमारतींची पहाणी केली होती. सदर पहाणीत सदर इमारतीचे पुनर्विकासाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळले होते. तरी याबाबत संबंधित अधिकारी व मा. सदस्य यांचे समवेत पहाणी करावी, जेणे करुन सदर बाबत तातडीने कार्यवाही करता येईल. तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, चतुर्भुजा हवा पुनर्रचित होणाऱ्या इमारतीत कमी गाळे होत असल्यामुळे, भाडेकरुंनी त्याच परिसरामध्ये नवीन पुनर्रचित होणाऱ्या इमारतीमध्ये त्या इमारतीतील उर्वरित भाडेकरुंना जागा

देण्याविषयी मुख्य अधिकाऱ्यांकडे विनंती केली आहे. त्यावर विचार होऊन त्यांना त्याच परिसरामध्ये जागा देण्यात यावी अशी विनंती केली. यावर मुख्य अधिकारी यांनी असा खुलासा केला की, मा. सदस्यांनी जी विनंती केली आहे ती मान्य करणे शक्य नाही. नविन पुनर्रचित इमारतीमध्ये जे अतिरिक्त गाळे उपलब्ध होतात ते ज्या भाडेकरूंच्या इमारती अरुंद भूखंडामुळे, महानगरपालिकेच्या आरक्षणामुळे, रस्ता रुंदीकरणामुळे पुनर्रचित करणे शक्य नाहीत अशा बृहत्सूचीवरील लाभधारकांना वितरीत केले जातात.

मा. सदस्या श्रीमती माला पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आपण जे ठेकेदारांना काम देतो, त्यांनी काम केल्यावर एक वर्षातच गळती वगैरे तक्रारी उपस्थित होतात, तर त्या त्यांच्याकडून करून घेण्याची अट का घालत नाही?

यावर मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असे प्रतिपादन केले की, मागील बैठकीत हा मुद्दा निविदा स्विकारताना त्यात कोणकोणत्या अटी व शर्तींचा समावेश केलेला आहे हे पाहणे जरुरी असल्याचे सांगितले होते. तसेच वॉटरप्रुफींगचे काम हे स्पेशलाइज्ड ठेकेदाराकडून करून घेतले पाहिजे व त्या कामाबद्दल त्यांच्याकडून कमीतकमी १० वर्षाची गॅरंटी घेतली पाहिजे.

मा. सभापती यांनी मागील बैठकीत मंगलमूर्ती आणि कन्हैयालालजीच्या निकृष्ट कामाबद्दल माहिती सभागृहात दिली होती. त्यानुसार संबंधित ठेकेदाराने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. परंतु तेथील रहिवाशांनी त्यांच्या निवेदनाद्वारे सदर काम बरोबर होत नसल्याचे कळविले आहे. रहिवाशांनी दिलेले निवेदन मा. सभापतींनी वाचून दाखविले व सदर कार्यवाही होणे जरुरीचे असल्याचे सांगितले.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे आश्वासन दिले की, जे काम बरोबर झालेले नाहीत ते संबंधित ठेकेदारने केले नाहीतर ते त्याच्या रीस्क आणि कॉस्ट वर केले जाईल. यावर मा. सदस्य श्री. ओझा यांनी सभापतींना अशी विनंती केली की, ठेकेदाराची चौकशी करण्यात यावी, त्यानुसार त्यांना काळे यादीत टाकावे. तसेच करोल मंगलमूर्ती व कन्हैयावाडा या इमारतींच्या कामासाठी कोणत्या वर्गातील ठेकेदारांना दिल्या आहेत याबद्दल माहिती यावी.

यावर मुख्य अधिकारी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील ठेकेदारांच्या वर्गवारीची सविस्तर कल्पना उपस्थितांना दिली. त्यांनी पुढे असेही सांगितले की, मंडळाच्या रजिस्टर ठेकेदारांनाच काम दिले जाते, तसेच आता ठेकेदारांच्या वर्गवारीसाठी प्राधिकरणाने नवीन समीती पुनर्रचित केली आहे, त्यामार्फत ठेकेदारांना रजिस्ट्रेशन दिले जाते.

मा. सदस्य श्री. रौफ पटेल यांनी असे सांगितले की, दुरुस्तीची जी कामे ठेकेदारांना दिली जातात त्या कामावर योग्य नियंत्रण असले पाहिजे आणि ठेकेदाराला जे काम योजून दिले जाते, ते काम तो काही वेळा अर्धवट ठेवतो, उदा. विट बांधकाम केले तर त्याला गीलावा करत नाही. लोखंडी बीम व कॉलम लावले तर त्यांना रंगकाम करत नाही व शेवटी पैसे संपले म्हणून ते काम अर्धवट सोडून जातो, त्यामुळे पुन्हा सदर इमारतींचे काम करतेवेळी पहीले काम परत करावे लागते. तरी ज्या भागाचे काम हाती घेतलेले असेल ते योग्यप्रकारे पूर्ण झाल्यावर पुढील काम करावे, अशी सूचना केली. यावर मा. सभापतींनी असे सांगितले की, जे काम ठेकेदाराला दिले जाते तो ते काम दुस-या ठेकेदाराला देतो व त्यामधील आपला हिस्सा काढून घेतो. यामुळे कामाचा दर्जा निकृष्ट होत असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी असे सांगितले की, ज्या इमारतींची पुनर्बांधणी केली जाते त्या भाडेतत्त्वावर न ठेवता ती मालकी तत्त्वावर करण्यात यावी, असे करुन दुरुस्तीसाठी मंडळावर बोजा पडणार नाही. तसेच जरुरी असल्यास याबाबत धोरणात्मक ठराव करावा.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, त्यांची अशीच कल्पना आहे, परंतु मुंबई बेटावर निरनिराळ्या भागांत वेगवेगळ्या पुनर्रचित इमारती आहेत. जेव्हा ह्या इमारती मालकी हक्काने दिल्या जातील तेव्हा त्या वेगवेगळ्या दराने वितरीत करणे शक्य आहे किंवा कसे. पुढे त्यांनी असे सांगितले की, ह्यावर कायमस्वरुपी उपाय योजावा लागेल, तसेच ज्या इमारती मालकी तत्त्वावर त्यांचा प्रत्यक्ष आलेला बांधकाम खर्च घेऊन देण्याचे ठरल्यास प्रामुख्याने ज्या पुनर्रचित इमारती चांगल्या लोकवस्तीत उदा. ताडदेव, दादर इ. विभागात पूर्वी १७० चौ. फूट दराने बांधण्यात आल्या आहेत व त्यांचा सध्याचा विक्रीचा किमान दर ३००० ते ५००० चौ. फूट आहे व आज ज्या इमारती कामगार वस्तीमध्ये ४०० ते ५०० चौ. फूट दराने बांधण्यात आलेल्या आहेत, या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल. तसेच जर एखाद्या पुनर्रचित इमारतींच्या भाडेकरुंनी एकत्र येऊन मालकी हक्काने त्यांची इमारत घेण्यास तयार झाल्यास हौसिंग प्रमाणे त्यांनाही एचडीएफसी किंवा हुडको कडून कर्ज घेऊन देता येतील.

यावर मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ज्या इमारतींचे काम बरोबर झाले नाही, अशा इमारतींची दुरुस्ती करुन त्या लोकांना मालकी हक्काने द्यावीत.

५१४

८२

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, जर असे केले तर भाडेकरूंची मागणी वाढत राहील व त्यांच्या तक्रारी वाढत राहतील. यावर मागणी दाखल त्यांनी मुंबई मंडळाच्या नेहरूनगर येथील इमारतींची माहिती सभागृहात दिली.

यावर मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असे सांगितले की, मंडळाची जी ११० महिन्याचे भाडे मालकी-ताबारकात देऊन भाडेकरूंना मालकी हक्क देण्याची योजना आहे, त्याचप्रमाणे पुनर्रचित इमारती मालकी हक्काने भाडेकरूंना का देवू नयेत? यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, ही योजना म्हाडा अधिनियम १९७६ कलम १०३ [ब] अंतर्गत फक्त "अ" वर्गातील उपकर-पात्र इमारतींसाठी आहे. त्यामुळे ही योजना पुनर्रचित इमारतींना लागू करणे शक्य नाही. सदर विषयावर, सन्मा. सदस्य श्री. चेतन शहा, श्री. सुनील कर्वे व इतर सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. अखेरीस मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सभासदांसमोर असा प्रस्ताव मांडला की, यापुढील ज्या पुनर्रचित इमारतींच्या योजना असतील त्या मालकीहक्काने द्याव्यात व त्यासाठी शासनाचे मार्गदर्शन घ्यावे. यावर मा. सदस्य श्री. ओझा यांनी सांगितले की, राजीव गांधी निवारा प्रकल्पा-मध्ये जी योजना चालू आहे त्यात भाडेकरूंना नवीन इमारतीमध्ये तीन टप्प्यामध्ये पैसे भरण्याची सवलत आहे, त्यात पहिला टप्पा गाळा वितरण करण्यापूर्वी देणे जरूरीचे आहे व उर्वरित रक्कम एच. डी. एफ. सी. मार्फत कर्ज घेऊन भाडेकरूंना तो २० वर्षात फेडायची आहे व जे अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील ते बाजार-भावाने विकले जातात.

यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून १०० कोटीचे अनुदान मिळालेले होते.

तसेच त्यांची योजना पूर्णपणे मालकी तत्वावर होती, तसेच त्यातील अतिरिक्त क्षेत्रफळ हे त्याच इमारतीतील भाडेकरूंना [बांधकाम खर्चापेक्षा जास्त व बाजारभावापेक्षा कमी दराने] प्रथम देऊ करणे बंधनकारक आहे.

यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असे सुचविले की, पुनर्बांधणीसाठी एक वेगळी योजना राबवावी जेणे करुन एक ठराविक रक्कम कायम करुन मालकीहक्काने घर देण्याची योजना कार्यान्वित करावी, म्हणजे त्यामधून जो निधी जमा होईल तो फक्त पुनर्बांधणीच्या कामाकरीता वापरला जाईल व ही चक्र कायमस्वरुपी अव्याहतपणे चालू राहील. यावर मा. सदस्य श्री. ओझा यांनी मा. सभापतींना विनंती केली की, त्यांनी याबाबत एक प्रारुप प्रस्ताव प्रथम तयार करावा त्यासाठी काही सदस्यांची समिती नेमून हा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा. ह्यास सर्व उपस्थित सदस्यांनी मान्यता दिली. मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, "अंग" परेल टँक रोड, मुं. १२ ही इमारत बांधून १९७७ साली त्यातील लोकांना जागा दिली. त्यात एकूण ९४ निवासींना सामावून उर्वरित ९५ गाळे राहिले त्यात ३० गाळे संक्रमण शिबिरास देण्यात आले व उर्वरित ६५ गाळे १९७७ पासून अजून रिकामे आहेत, त्यात कोणी रहात नसल्यामुळे तसेच त्याची देखभाल न केल्यामुळे त्याची बिकट अवस्था आहे. तरी त्यांनी सुचविले की, नियमावर बोट न ठेवता त्या जागा वितरीत कराव्यात.

यावर मुख्य अधिकारी यांनी त्यांना आपण यावर जो व्यवहार्य पर्याय आहे तो सुचवावा, योग्य असल्यास मंडळ निश्चित विचार करेल. त्यांनी पुढे असे सांगितले की, सदर इमारतीतील भाडेकरूंनी एकत्रितपणे मा. सभापतींना निवेदन सादर करुन प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

५१६

मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, पुनर्रचित इमारतींमध्ये टी.ओ.टी. मध्ये किती रक्कम जमा झाली आहे व ही योजना पुढे का चालू केली नाही? यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, टी.ओ.टी. मधून एकूण अंदाजे ६ कोटी रुपये जमा झाले असून ही योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच ह्या योजना जास्तीतजास्त फलद्रुप होण्यासाठी सर्व पुनर्रचित इमारतींमध्ये फलक लावण्यांत आलेले आहेत.

मा. सदस्य श्री. ओझा यांनी पी. डब्ल्यू. डी.ने १० ऑक्टोबर रोजी टी.ओ.टी. च्या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाबद्दल माहिती सभागृहात दिली.

मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जे लोक टी.ओ.टी. च्या योजनेसाठी पुढे येत नाहीत त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी, जेणे करुन ते सुध्दा यात सहभागी होतील व या योजनेचा जो उद्देश आहे तो सफल होईल.

मा. सदस्या डॉ. माला पाटील यांनी मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, सायन संक्रमण शिबिरात जे भाडेकरु रहात आहेत त्यांना मालकी हक्काने तेथेच पुनर्बांधणी करण्यासाठी परवानगी द्यावी. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, आपण तसा प्रस्ताव भाडेकरुंमार्फत सादर करावा. मंडळास जर योग्य वाटला तर त्याबाबत आपणास योग्य ते सहकार्य दिले जाईल.

मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांना उपमुख्य अभियन्ता (पुनर्रचना) श्री. शहा यांना जे ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करतात त्यांच्यावर कोणत्या प्रकारे कार्यवाही केली जाते याची सभागृहात माहिती देण्याची विनंती केली. यावर उपमुख्य अभियन्ता (पुनर्रचना) श्री. शहा यांनी सांगितले की, गळतीच्या

जलरोधनाचे कामासाठी संबंधित ठेकेदाराकडून ७ वर्षांची हमी घेतली जाते. त्या काळामध्ये जर काही गळती झाली तर ती त्या ठेकेदारामार्फत करुन घेतली जाते. तसेच इमारतीच्या बांधकामाबाबत काही तक्रार असल्यास त्या ठेकेदाराला नोटीस काढून त्याची दुरुस्ती करुन घेतली जाते. जर त्यांनी ती केली नाहीतर त्यांच्या रीस्क ॲन्ड कॉस्टवर केली जाते व तशी निविदेमध्ये अट घालती जाते व इमारतीच्या बांधकामासाठी १० वर्षांची हमी मूळ ठेकेदाराकडून घेतली जाते. तसेच ५% अनामत रक्कम त्यांच्या देयकातून बाजूला काढली जाते. यावर मुख्य अधिकारी यांनी विचारणा केली की, हा जो एक वर्षाचा कालावधी आहे तो बदलला आहे का? यावर खुलासा करताना उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] यांनी सांगितले की, पूर्वी हा कालावधी तीन वर्षांचा होता. यावर मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता

पूर्तता [पुनर्रचना] श्री. शहा यांना असे निर्देश दिले की, सदर

उ.मु.अ.[पुनर्र.] बैठकीतील झालेल्या चर्चेनुसार आपण याबाबत एक वर्षाच्या कालावधी ऐवजा ५ वर्षांचा कालावधी व बँक गॅरेंटीची शिफारस करुन सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत पाठवावा.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. मोहन देसाई ह्यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, फोर्ट येथील इ. क्र. १७१ बोरा बाजार स्ट्रीट ह्या इमारतीची दुरुस्ती सुरु असून मंडळाने आतापर्यंत चारदा दुरुस्ती केली आहे, यावर त्यांनी मुख्य अधिकारी ह्यांना अशी विनंती केली की एकच इमारत सारखी सारखी दुरुस्त करुन त्या इमारतीवर पैसा खर्च करण्याऐवजी आजूबाजूच्या उपकरप्राप्त इमारती ज्या अद्यापपर्यंत दुरुस्त केलेल्या नाहीत व त्यांची दुरुस्ती आवश्यक आहे, अशा इमारतींच्या दुरुस्तीस प्राधान्य द्यावे.

५१८

यावर मुख्य अधिकारी ह्यांनी असे आश्वासन दिले की, सदरहू इमारतीच्या कोणत्या भागांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे व सध्या कोणत्या भागाची दुरुस्ती चालू आहे याबाबतचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडून मागविण्यात येईल व सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

ता । मु.अ.[दक्षिण] ।

याबाबत मा. सदस्या श्रीमती सरोज कपाडिया ह्यांनी सांगितले की, सदरहू इमारत पाडून पुनर्बांधणीकरिता घेण्यात यावी, सदर इमारत गेल्या सहा-सात वर्षांपासून रिकाम्या अवस्थेत असून, तीत कोणीही रहात नसताना देखील सध्या तिची दुरुस्ती घेण्यात आलेली आहे.

यावर खुलासा करताना मुख्य अधिकारी ह्यांनी म्हटले की, पुनर्बांधणी करावयाची म्हटल्यास अनेक अडचणी येतात, त्या अडचणींवर मात करुन पुनर्बांधणी योजना राबवायची म्हटल्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता असते, कारण मालमत्ताधारक भूसंपादनाविरुध्द न्यायालयात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच इमारतींची दुरुस्ती ही प्रचलित मर्यादेत होत असते व जर प्रचलित मर्यादेपेक्षा खर्च जास्त होत असल्यास व अधिकचा खर्च भाडेकरुंनी भरल्यास तिची दुरुस्ती करणे हे मंडळास भाग आहे. सदरहू इमारतीबाबत बोलताना श्री. कुराणी उपमुख्य अभियंता [द.] ह्यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, ह्या इमारतीच्या जुन्या भाडेकरुंनी रु.७५०/- प्रति चौ.मी. पेक्षा अधिक येत असलेल्या रकमेचा भरणा मंडळाकडे करण्यास तयारी दर्शविली आहे, त्यामुळे सदरहू इमारतीची दुरुस्ती थांबवता येणे शक्य होणार नाही. यांस मुख्य अधिकारी/दुवपुमं. ह्यांनी देखील सहमती दर्शविली.

पुढे, चर्चा करतांना, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी ह्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मुंबई शहरात झालेल्या दंगलीत व बॉम्बस्फोटामध्ये हानिग्रस्त झालेल्या इमारतींची दुरुस्ती मंडळाने घेतली होती, त्यापैकी काही

इमारतींचे काम झाले आहे, तर काही इमारतींचे काम अद्यापि झालेले नाही, जर दुरुस्ती काम अपूर्ण आहे, तर त्याची माहिती मंडळापुढे सादर करावी, कारण अशा इमारतीतील रहिवाशी हे त्यांच्याकडे याबाबत सारखी विचारणा करीत असतात की, मा. मंत्री-महोदयांनी असे आश्वासन दिलेले आहे की, दंगलीत व बॉम्बस्फोटामध्ये हानिग्रस्त झालेल्या इमारतींची संपूर्ण दुरुस्ती करण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे, तरीदेखील पैशाअभावी काम अपुरे आहे असे आढळून येते. आमदारांनी त्यांनी नळबाजारातील एका इमारतीचे उदाहरण दिले, ह्या इमारतीचे ६०% काम अगदी व्यवस्थितरित्या झालेले असून, ४०% काम अद्यापि बाकी आहे, ह्या इमारतीतील रहिवाशी अत्यंत गरीब असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने दुरुस्तीचा भार ते सोसू शकत नाही, त्यामुळे उर्वरित ४०% कामे पूर्ण करण्यात मंडळामार्फत हालचाल होणे अत्यंत आवश्यक आहे.

यावर खुलासा करताना श्री. कुरेशी, उप-मुख्य अभियन्ता [द.] ह्यांनी सांगितले की, रु. ७५०/- प्रति चौ.मी. पेक्षा अधिक येत असलेली रक्कम शासनाने अद्यापि दिलेली नसल्याने दुरुस्तीचे काम खोळंबून राहिले आहे, याबाबत बोलताना मुख्य अधिकारी ह्यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, दंगलीत व बॉम्बस्फोटामध्ये हानीग्रस्त झालेल्या इमारतींची संपूर्ण दुरुस्तीकरुन त्या पूर्वस्थितीत आणण्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध होण्याबाबत मा. मंत्री-महोदय, शासनाचे उच्च पदाधिकारी ह्यांचेसमवेत त्यावेळचे सभापती व मुख्य अधिकारी ह्यांनी अनेकदा बैठका आयोजित केलेल्या असून, अद्यापि शासनाकडून दंगलीत व बॉम्बस्फोटात हानिग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता विशेष निधी मंडळास उपलब्ध झालेला नाही.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. मोहन देसाई ह्यांनी सभागृहास अशी माहिती दिली की, जुनी इ.क्र. ९, जेल रोड, डोंगरी येथे १९७७ पासून एक रहिवासी श्री. काशीनाथ अंबू घरत रहात होते, त्याच्या शेजारीच इमारतीचे मालक श्री. पाटील रहात होते, सदर मालक श्री. पाटील ह्यांनी रहिवासी श्री. घरत ह्यांना नाना प्रकारे त्रास देऊन तेथून हुसकावून लावले त्यामुळे तो दुसरीकडे रहावयास गेला. सध्या ही इमारत पाडण्याचे प्रस्तावित असून, तेथील सर्व रहिवाश्यांना जागा खाली करण्याच्या नोटीसा [व्हेकेशन नोटीस] देण्यांत आल्या आहेत, परंतू सदरहू रहिवासी श्री. घरत ह्यांनी जुन्या इमारतीत रहात असल्याचे सर्व कागदोपत्री पुरावे सादर केलेले असलेतरीही त्यांना व्हेकेशन नोटीस मंडळामार्फत देण्यांत आलेली नाही, अशी तक्रार सदरहू रहिवाश्याने त्यांच्याकडे केलेली आहे, तरी त्यांस व्हेकेशन नोटीस न देण्याचे काय कारण असू शकेल.

यावर उत्तर देताना मुख्य अधिकारी ह्यांनी मा. सदस्य श्री. मोहन देसाई ह्यांना सांगितले की, त्यांनी सांगितलेल्या रहिवाश्यास व्हेकेशन नोटीस न देण्यांत काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही, मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या माहितीच्या आधारे, तसेच सध्या इमारत अस्तित्वात असल्यास प्रत्यक्ष जागेवर जाऊन योग्यत-हेची तपासणी करुन प्रत्यक्षात खरा रहिवासी कोण आहे, याबाबत शहानिशा करुन व्हेकेशन नोटीस देण्याची कार्यवाही करणे शक्य आहे. परंतु मुख्य अधिकारी ह्यांनी पुढे असेही सांगितले की, मंडळाच्या बैठकीपुढ असे एखादे वैयक्तिक प्रकरण आणल्यास त्यावर चर्चा करत असण्यापेक्षा अशी प्रकरणे पर मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांमार्फत हाताळली

तर योग्य होईल आणि खरोखरच जर असे एखाददुसरे प्रकरण गंभीर असेल, तरच ते मंडळाच्या सभेत चर्चेकरिता आणावे, तेव्हा यापुढे शक्यतो अशा वैयक्तिक तक्रारी/प्रकरणे सभेपुढे आणण्याचे टाळल्यास योग्य होईल. कारण पुढील बैठकीत जर अशाप्रकारची आठवडा प्रकरणे आल्यास मंडळाच्या अधिका-यांना महत्वाची कामे बाजूला ठेवून त्या तक्रारींचे निवारण करण्यास वेळ द्यावा लागेल, तेव्हा अशी प्रकरणे संबंधित अधिका-यांमार्फत सोडविण्यात यावी अशी विनंती त्यांनी सदस्यांना केली.

याबाबत मा. सभापती श्री. कोकाटे ह्यांनी देखील असे प्रतिपादन केले की, त्यांच्याकडे काही रहिवाश्यांचे असे अर्ज आले आहेत की, मंडळाच्या बृहत्सूचीवर असून देखील त्यांना पुनर्रचित इमारतीत गाळे वितरित केले जात नाहीत, असे तक्रार अर्ज त्यांनी उपमुख्य अधिकारी (पु.गा.) श्री. क्षीरसागर ह्यांच्याकडे पाठविले असता, त्यांनी असे सांगितले की सध्या बृहत्सूचीवर रहिवाश्यांना गाळे वितरण केले जात नाही, तरी याची काय कारणे आहेत असे मा. सभापतींनी विचारले.

यासंदर्भात खुलासा करताना मुख्य अधिकारी ह्यांनी सभागृहास अवगत करून दिले की, दिनांक १७ ऑक्टोबर १९९४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत असे ठरले की, जी नोव्हेंबर ९३ मध्ये बृहत्सूची [मास्टरलिस्ट] तयार करण्यांत आली आहे ती सदोष असून काही ख-या रहिवाश्यांचा तीत समावेश केलेला नसल्याने तसेच ज्यांना आतापर्यंत बृहत्सूचीमार्फत गाळे वितरण केले आहेत, त्यांच्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्याने, जी बृहत्सूची तयार करण्यांत आली आहे, तिची पुन्हा एकदा छाननी करून मुख्य अधिका-यांच्या मान्यतेने ती सुधारित करण्यांत यावी.

मुख्य अधिकारी इयांनी पुढे असेही सांगितले की, सदरहू बृहत्सूची सुधारित करण्याचे काम चालू असून एक दोन महिन्यात तो तयार होण्याचे अपेक्षित आहे.

यावर सर्व सदस्यांनी असे सांगितले की, ज्यावेळेस बृहत्सूची [मास्टरलिस्ट] तयार करण्यांत आली होती, त्याची संपूर्ण माहिती प्राधिकरणास सादर करण्यांत आली होती, त्यामुळे आता सदर बृहत्सूचीबाबत शंका/आक्षेप घेणे कितपत उचित आहे.

चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, बृहत्सूचीबाबत प्राधिकरणाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, जेणेकरुन बृहत्सूचीमार्फत थांबलेले गाळेवितरणाचे काम सुरु होऊ शकेल.

मा. सदस्य श्री. लष्करी इयांनी मा. सभापती महोदय हे प्राधिकरणाच्या बैठकीत निमंत्रित म्हणून उपस्थित राहू शकतात, त्यांनी "बृहत्सूची" बाबतचा मुद्दा प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत मांडावा अशी विनंती केली.

तदनंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. सभापतींनी सभा समाप्त झाल्याचे जाहिर केले.

पुढील बैठक सर्वानुमते शुक्रवार दि. १६ डिसेंबर १९९४ रोजी सकाळी ११.०० वा. घेण्याचे ठरले.

सही/-

नि. का. अ. /दुवपुमं.

सही/-

उपसभापती व मुख्य अधिकारी/दुवपुमं.

सही/-

सभापती / मुंइदुवपुमं.

दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक २९.११.१९९४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दक्षिण परिमंडळातील मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांची माहिती.

[मूळ अंदाजपत्रके] [परिशिष्ट "अ"]

अ.क्र.	विभाग	इमारतीचा तपशिल	दुरुस्तीचा टप्पा / मंडळे/ नाहप्र	मजल्यांची संख्या / रहिवाशांची संख्या	क्षेत्रफळ / दर/चौ. मिटर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.७५०/- प्रति चौ.मी. दरा प्रमाणे मंजूरीसाठी प्रस्तावित रक्कम	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१.	सी१/२	१४२ एफ. भुलेश्वर रोड	दुसरा / मंडळ	तळ अधिक ४ / ५१ अधिक १३=६४	१५१७.०० / ६१४.००	९८१०६५/- / ५७१२५५/-	५७१२५५/-	
२.	डी-१	११ डॉ. डी. साठे मार्ग	दुसरा / मंडळ	तळ अधिक २ / ४ अधिक २ = ६	४२२.४८ / ६७५.२४	२८५२७५/- / २१७७७५/-	२१७७७५/-	
३.	डी-१	३० अे. पावधाला लेन	तिसरा / मंडळ	तळ अधिक ३ / १८ अधिक ० = १८	९१३.५२ / ७४९.२७	६८५११४/- / ३०६३७९/-	३०६३७९/-	
४.	डी-१	२० टेल. जे. एस. एस. रोड	तिसरा / मंडळ	तळ अधिक ३ / १५ अधिक ४ = १९	७३०.०० / ७३२.८६	५३४९८९/- / १७४९८९/-	१७४९८९/-	
५.	डी-१	२९ सी खोताची वाडी	पहिला / मंडळ	तळ अधिक २ अधिक ३ अंशतः / ७ अधिक ० = ७	४६८.१६ / ४५५.७८	२१३३७९/- / २१३३७९/-	२१३३७९/-	
६.	डी-१	४८-६२ हरिश्चंद्र गोरेगांवकर रोड	चौथा / मंडळ	तळ अधिक ३ / ५३ अधिक २१ = ७४	२०३०.१० / ६४२.८३	१३०५०१६/- / ३३५७७५/-	३३५७७५/-	
७.	सी१/२	१३२ बापू खोटे स्ट्रीट	पहिला / मंडळ	तळ अधिक ३ / ६ अधिक २ = ८	४२४.०० / ७२७.२९	३०८५८३/- / ३०८५८३/-	३०८५८३/-	

६७

२

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
८.	सी१/२	१०५-१०९ किका स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ अधिक ३	६९२.००	४०१४७७/-	३३४७७७/-	
				१० अधिक ८=१८	५८०.१६	३३४७७७/-		
९.	डी-१	१५२ अे.बी.जे.मार्ग [ठाकूरद्वार रोड]	चौथा मंडळ	तळ अधिक २	९९०.००	५६६१३१/-	२६९३५६/-	
				४० अधिक ३=४३	५७१.८५	२६९३५६/-		
१०.	डी-२	५०-५२ काबेजर स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ अधिक ३ अधिक ४ अंशत:	५२७.७१	३५०९६१/-	१६३०४८/-	
				१४ अधिक ३=१७	६६५.७१	१६३०४८		
११.	डी-२	४२३ सी मौलाना शौकत अली रोड	तिसरा मंडळ	तळ अधिक २	७३४.७६	५४१८४९/-	३८५६१३/-	
				१९ अधिक ८=२७	७३७.४५	३८५६१३/-		
१२.	डी-१	११ अे भास्कर भाऊ लेन	पहिला मंडळ	तळ अधिक ३	२०८.९७	१३४०३२/-	१३४०३२/-	
				६ अधिक ० = ६	६४१.३९	१३४०३२/-		
१३.	डी-२	२३१-२३५ डॉ.डी.बी. मार्ग	तिसरा मंडळ	तळ अधिक ४	१७३८.१५	१२८९८९९/-	६९४६४२/-	
				२८ अधिक १९=४७	७४२.११	६९४६४२/-		
१४.	डी-१	२६० सी.के.एस.एस. रोड	चौथा मंडळ	तळ अधिक २	१३६०.८०	१०२७५३८/-	३१०२३६/-	६९३८/-
				४८ अधिक ०=४८	७५५.०९	३१७१७४/-		
१५.	सी१/२	४१-४३ सैफि ज्युबिली स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ अधिक ५	५४३.४५	६००९९१/-	३४९५७९/-	११३४०३/-
				१० अधिक २=१२	११०५.८८	५४२९९२/-		
१६.	बी	१३ अे टनटनपुरा स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ अधिक २	२७१.७०	२६८४५२/-	१३६७०५/-	६५०७४/-
				१० अधिक २=१२	९८९.९७	२०१७७९/-		
१७.	सी१/२	११०-११६ इस्माईल करटे रोड	दुसरा मंडळ	तळ अधिक ३	३८३.००	४६८१६५/-	२४१२९०/-	१८०९१५/-
				९ अधिक ८=१७	१२२२.३६	४२२२०५/-		

३.

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१८.	बी	१४८-१५० नागदेवी स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ अधिक ४ २ अधिक ६ = ८	५८९.७५ ७०६.५४	४१६६७९/- ३७१०३७/-	३७१०३७/-	
१९.	डी-२	३१४-३२८ फॉकलंड रोड	तिसरा मंडळ	तळ अधिक २ ११ अधिक ६ = १७	६९७.१४ ७४७.३४	५२१००१/- २१४१९३/-	२१४१९३/-	
२०.	डी-२	२६ रतन टाटा रोड	तिसरा मंडळ	तळ अधिक ३ २६ अधिक ३ = २९	११२४.४४ ८२४.४३	९२७०२७/- ४४४७६२/-	३६१०६५/-	८३६९७/-
२१.	अे	१०५/१०९ पा.एन. स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ अधिक५ १९ अधिक ३ = २२	११३६.०० ७०७.६३	८०३९२६/- ८०३९२६/-	८०३९२६/-	
२२.	डी-२	२२३-२६३ फॉकलंड रोड	दुसरा मंडळ	तळ अधिक १ अधिक २-अंशत: ५८ अधिक २१ = ७९	२१०३.३३ ७४९.३४	१५७६१२१/- ५८३२९६/-	५८३२९६/-	
२३.	बी	३२/३८ कोळसा स्ट्रीट	तिसरा[सु] मंडळ	तळ अधिक ४ अधिक अंशत: १९ अधिक १७=३६	९५२.२३ ६६१.९५	९१५९९८/- ५५४७४८/-	१००५९४/-	२०१८२५/-
२४.	डी-२	२९४-२९६ डॉ.डी. बी.मार्ग	दुसरा[सु] मंडळ	तळ अधिक ५अधिक ६ अंशत: ४ अधिक ३ = ७	३४६.०० ७३९.९०	२५६००५/- २०१००५/-	८२५३५/-	
२५.	डी-२	३०/५० एम.एस. अली मार्ग	दुसरा[सु] मंडळ	तळ अधिक ४ ३६ अधिक ११=४७	२५०२.०२ ६८९.००	१७२२८९८/- १४८००२८/-	२५०३४१/-	
२६.	सी१/२	१३२ डी, भुलेश्वर रोड	पहिली[सु] मंडळ	तळ अधिक ४ ४८	१२४९.७७ ६८२.३७	८५२८०७/- ५३२८०७/-	४९७०८९/-	
२७.	सी३/४	२३/२५ तिसरी अग्यारी लेन	पहिला[सु] मंडळ	तळ अधिक ५ ८ अधिक ५ = १३	५६८.४५ ६९०.९५	३९२३१९/- ३९२३१९/-	४२६३३७.५०	
२८.	अे	११/१२ मिंट रोड	पहिला[सु] मंडळ	तळ अधिक ६ ४९ अधिक ८=५७	२०३८.३३ ५७९९.५५	१२३१३३०/- १२३१३३०/-	१०५८६८१०/-	

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	
२९.	सी३/४	२९-३१ जुनी हनुमान	तिसरा	तळ अधिक ३	५२६.००	३४१६८१/-	११६३४६/-	
			ना.ह.प्र.	४ अधिक १७ = २१	६४९.०८	११६३४६/-		
३०.	डी २	९ उरणवाला स्ट्रीट	पहिला	तळ अधिक ४	११०१.०७	५०१२९१/-	५०१२९१/-	
			ना.ह.प्र.	१० अधिक १=११	४५५.२८	५०१२९१/-		
३१.	बी	३०९/३१५ इब्राहिम रहिमतुल्ला रोड	दुसरा	तळ अधिक ४	१०९८.००	७६५०६५/-	६७५०६५/-	
			ना.ह.प्र.	२४ अधिक ५ = २९	६९६.७८	६७५०६५/-		
३२.	सी१/२	९६-९६ ए अली उमर स्ट्रीट	दुसरा	तळ अधिक ४	३६२.०९	६६८०१८/-	१५४९९२/-	
			ना.ह.प्र.	९ अधिक ३ = १२	१९४४.८९	५५१४४३/-		
३३.	सी१/२	१११/११३ सैफी ज्युबिली स्ट्रीट	पहिला	तळ अधिक ४	४६७.५९	४३२४४४/-	३५०६९३/-	८१७५१/-
			ना.ह.प्र.	११ अधिक १ = १२	९३४.८३	४३२४४४/-		
३४.	सी१/२	३९-४१ बारा इमाम रोड	तिसरा	तळ अधिक ३	४१२.००	३००३३६/-	१४३५९६/-	
			ना.ह.प्र.	१६ अधिक ३ = १९	७२८.९७	१४३५९६/-		

दिनांक २१.११.९४ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या २६ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली अंदाजपत्रके [आर. परिमंडळ] [परिशिष्ट "ब"]

अ.क्र.	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा मंडळ/नाहप्र	मजले, भाडेकरू निअनि. एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी. खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम निव्वळ टप्प्याची रक्कम	बैठकीत मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.
१.	ई-१	ब	इमारत क्र. २१६-ई, खलील मॅन्शन सर जे.जे.रोड	पहिला ना.ह.प्र.	तळ + ३ + ४ अंशत: १८ + ० = १८	१६७१.९२ ५८९.११	रू. ९८९६६४.०० रू. ९८९६६४.००	रू. ९८९६६४/-	
						एकूण	रू. ९८९६६४.०० रू. ९८९६६४.००	रू. ९८९६६४.००	

सुधारीत अंदाजपत्रके

अ.क्र.	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा मंडळ/नाहप्र	मजले, भाडेकरू निअनि. एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी. खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम निव्वळ टप्प्याची रक्कम	बैठकीत मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम	शेरा
१.	ई-२	अ	इ.क्र. २/१२ मन्सूर बिल्डींग मोहम्मद उमर राजीब रोड	दु.सुधारीत ना.ह.प्र.	तळ + ३ १४ + १७ = ३१	रू. ७०६.११ रू. ९१६.६६	रू. ६४७२६५.०० रू. ५३२२८४.००	रू. २२९५७९.००	
२.	ई-२		इ.क्र. २४५ बी, एम.ए.रोड	दु.सुधारीत मंडळ	तळ + ४ ४१ + ० = ४१	रू. १३५७.१५ ३२५.८९	रू. ४४२२९२.०० रू. २८९७६५.००	रू. ८२६८८.००	
३.	फ.ग.[उ]		इ.क्र. १६३ मनमोहन मॅन्शन, टी.एच.कटारिया मार्ग	दु.सुधारीत मंडळ	तळ + १ ११ + ७ = १८	४८३.६० ७०७.८२	रू. ३४२३०४.०० रू. २११४८५.००	रू. १०५९६४.००	
	फ.ग.[उ]		इ.क्र. १३७-१४१ सानेवाडी, चेंबर लेडी जमशेटजी रोड	दु.सुधारीत मंडळ	तळ + ३ १३ + ५ = १८	८०२.०९ रू. ६३८.७६	रू. ५०४३२८.०० रू. ४००११८.००	रू. १४८९११.००	
	फ.ग.[उ]		इ.क्र. १८, डी.एल.वैद रोड दादर	दु.सुधारीत मंडळ	तळ + ३ १३ + १ = १४	८७६.७३ रू. ७१९.८९	रू. ६३११५३.०० रू. ५७९६२५.००	रू. २६०७९८.००	

६९

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

शुक्रवार दि. १६ डिसेंबर १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २७ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २७ वी बैठक शुक्रवार दि. १६ डिसेंबर १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] श्री. मनोहर विठोबा कोकाटे, — सभापती.
२] श्री. अशोक लाल, — उपसभापती तथा मुख्य अधिकारी.
३] श्री. सुनील कर्वे, — सदस्य.
४] श्री. राजा चव्हाण, — "
५] श्री. बाळकृष्ण धुमाळे, — "
६] श्री. हेमंत मंडलिक, — "
७] श्री. राजेंद्र कोलकर, — "
८] श्री. मोहन देसाई, — "
९] श्री. चेतन शाह, — "
१०] डॉ. माला पाटील, — "
११] श्री. कृष्णा गेनू कांबळे, — "
१२] श्री. अब्दुल रौफ मलिक, — "
१३] श्रीमती सरोज कपाडिया. — "
१४] श्री. गजेंद्र लष्करी, — "
१५] श्री. रॉकी फ्रास्टो, — "
१६] श्री. उमाशंकर ओझा, — "
१७] मुख्य अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी.

उपसचिव श्री. यादवराव कांबळे दुसऱ्या महत्त्वाच्या कामकाजामुळे आजच्या बैठकीस हजर राहू शकणार नाही असे त्यांनी आगाऊ कळविले होते.

सभेस सुरुवात करण्यापूर्वी मा. सदस्य श्री. हेमंत मंडलिक यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे एक विद्यमान सदस्य श्री. सुनील कर्वे यांची मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारणीवर सदस्य [सिनेट मेंबर] म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांचे अभिनंदन